|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## अभ्यासमंडळ विभाग

जा.क्र. कबचौउमवि/२१/पदव्यूत्तर अभ्यासक्रम /१८४/२०२० दि. २७.०७.२०२०

प्रति,

**कबचौउमवि. संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था,**

यांचे मा. प्राचार्य / मा. संचालक / विभागप्रमुख,

यांना..

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पदव्यूत्तर (एम.एस्सी /एम.ए/ एम.कॉम भाग -१) अभ्यासक्रम आणि एम.बी.ए भाग-१, एम.एम.एस (कॉम्प्यूटर मॅनेजमेंट भाग-१), एम.एम.एस (पर्सनल मॅनेजमेंट भाग-१), एम.बी.ए भाग-१ (इंटीग्रेटेड), एम.एस.डब्ल्यू भाग-१, वर्गांच्या अभ्यासक्रमांमध्ये कोणताही बदल न करता तसेच कायम ठेवण्याबाबत..

महोदय/ महोदया,

आपणास विदीतच आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गांकरीता पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती (C.B.C.S) व शै.वर्ष १९-२० पासून व्दितीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान च्या वर्गा करीता पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती (C.B.C.S) लागू करण्यात आली असून नैसर्गिक दृष्टया शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून तृतीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञानच्या वर्गांकरीता पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती (C.B.C.S) लागू करण्यात येत आहे.

या अनुषंगाने आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून **एम.एस्सी / एम.ए / एम.कॉम भाग -१, एम.बी.ए भाग-१, एम.एम.एस (कॉम्प्यूटर मॅनेजमेंट भाग-१), एम.एम.एस (पर्सनल मॅनेजमेंट भाग-१), एम.बी.ए भाग-१ (इंटीग्रेटेड), एम.एस.डब्ल्यू भाग-१** या वर्गांचे अभ्यासक्रम बदलणार होते.

परंतू शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये तृतीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गांकरीता **पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती (C.B.C.S)** अभ्यासक्रम लागू होत असल्याने या वर्गांचे विद्यार्थी **शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१** मध्ये **C.B.C.S** नुसार अंतिम वर्षाची परीक्षा देणार आहेत. त्यामुळे अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी **शैक्षणिक** वर्ष २०२१-२१ मध्ये पदव्यूत्तर अभ्यासक्रम **पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती** नुसार तयार करणे आवश्यक आहे.

तेव्हा, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हीत लक्षांत घेवून, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये **पदव्यूत्तर (एम.एस्सी /एम.ए/ एम.कॉम, भाग-१)** वर्गांच्या अभ्यासक्रमांसह **एम.बी.ए भाग-१, एम.एम.एस (कॉम्प्यूटर मॅनेजमेंट भाग-१), एम.एम.एस (पर्सनल मॅनेजमेंट भाग-१), एम.बी.ए भाग-१ (इंटीग्रेटेड), एम.एस.डब्ल्यू भाग-१,** वर्गांच्या अभ्यासक्रमांमध्ये कोणताही बदल न करता तसेच कायम ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त बाब, आपल्या महाविद्यालयांतील अधिनिस्थ असलेले अध्यापक, प्राध्यापक तसेच महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

कळावे.

K.B.C. NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001 (INDIA)

आपला विश्वासू,

**कक्ष अधिकारी**

अभ्यास मंडळ व प्रवेश पात्रता विभाग

**सोबत :** अभ्यासक्रमांची यादी .

प्रत माहितीसाठी :-१) मा. कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव. २) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.३) मा.प्र.कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव. ४) मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव. ५) मा.जनसंपर्क अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव. ६) ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.